ePaper

## "...तर अशाने देश गुलामच होईल": संजय राऊत




|वर्ष - 6 |अंक - 350 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com |रविवार, दि. 9 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


### आतील पानांत


- 'चौथ्या स्तंभाने जबाबदारीचे भान ठेवावे'
- संत तुकोबांच्या पालखीचे १० जूनला प्रस्थान
- अनेक जिल्ह्यात अवकाळी पावसाचा कहर


## पीसीएमसी पे हुकमत बनेगीं कैसे



# राष्ट्रवादी तो 'इम्रान' भरोसे!

### राष्ट्रवादीची मदार युवकाध्यक्ष इम्रान शेख यांच्यावर : आंदोलनात माजी नगरसेवक, जुने-जाणते चेहरे दिसेनात

|पिंपरी|

महाईन्यूज |प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सुमारे १६०० जणांची कार्यकारिणी आहे, असा दावा केला जातो. 'फादर बॉडी'सह विविध सेलच्या माध्यमातून अनेकांना पदवाटप केले आहे. मात्र, आंदोलन, निदर्शने आणि पक्षाची ताकद दाखवण्यासाठी युवक सेलचे शहराध्यक्ष इम्रान शेख यांच्यावर अवलंबून रहावे लागते, असे चित्र आहे. कारण, जुने-जाणते सोडाच दोन-चार अपवाद वगळता एकही माजी नगरसेवक आंदोलनाकडे फिरकत नाही. पक्ष सत्तेत नसताना संघटनात्मक मजबुती करणे अपेक्षीत असताना शहर राष्ट्रवादी 'गहाळ' भूमिकेत दिसत आहे.**






परिणामी, "पीसीएमसी पे हुकमत बनेगीं कैसे; राष्ट्रवादी तो 'इम्रान' भरोसे!..." अशी चर्चा शहराच्या राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. इम्रान शेख यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना एकत्रित करायचे. शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी आपल्या गाडीतून चार-पाच लोकांना घेवून यायचे. केवळ 'प्रोटोकॉल' म्हणून त्याच-त्याच १५-२० जणांनी आंदोलन, निदर्शने आणि आयुक्तांना पत्र देण्यासाठी उपस्थित रहायचे, असा नित्यक्रम आहे. त्यामुळे शहर राष्ट्रवादीवर आता केवळ पत्रकबाजी करणारे पदाधिकारी आणि पक्ष म्हणून बोट दाखवले जात आहे. युवक सेल, महिला सेल, ओबीसी सेल, डॉक्टर सेल, क्रीडा सेल, वकील सेल, युवती सेल अशा विविध सेल राष्ट्रवादीत आहेत. त्यामाध्यमातून दीड हजाराहून अधिक पदाधिकाऱ्यांना पक्षाशी जोडले नव्हे, तर अधिकार पदावर बसवले आहे. संघटनात्मक कार्यक्रमांना याच पदाधिकाऱ्यांकडून पाठ फिरवली जाते. त्यामुळे राष्ट्रवादीचा 'वचक' कमी झालेला दिसतो. यासह केवळ पत्रक दिले की आपली भूमिका संपली, अशा मानसिकतेत शहराचे प्रमुख पदाधिकारी दिसत आहेत. आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर संजोग वाघेरे यांच्यासह अनेक ज्येष्ठ पक्षाच्या कार्यक्रमांपासून चार हात लांब आहेत. त्यांना सोबत घेतल्याशिवाय महापालिका निवडणूक जिंकता येणार नाही. ही बाब शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी लक्षात घेतली पाहिजे.

### इम्रान शेख कुशल संघटक...

»राज्यात महाविकास आघाडीची सत्ता स्थापन झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून शहरातील संघटनात्मक बदल घडवण्यात आले. पक्षांतर्गत विरोध असतानाही इम्रान शेख यांच्यावर पक्षाने युवक शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. जुन्या-नव्यांचा समन्वय करीत इम्रान यांनी संघटनात्मक बांधणी करण्याचा प्रयत्न केला. त्याचा प्रत्यय चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत आला. इम्रान यांनी मावळचे आमदार सुनील शेळके यांच्यासोबत या निवडणुकीत ४५० युवकांची टीम उभी केली. त्यामुळेच महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांना भाजपासमोर तगडे आव्हान उभा करता आले. मात्र, केवळ इम्रान यांच्या बळावर "राष्ट्रवादीची नौका पार" होणार नाही. ही बाब शहरातील ज्येष्ठ आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांनी लक्षात घेतली पाहिजे, असा राष्ट्रवादीतील निष्ठावंतांचा सूर आहे.

### अजित गव्हाणे यांची 'फुसका बार' कार्यपद्धती

»महाविकास आघाडीची सत्ता असताना अजित गव्हाणे यांच्यावर शहराध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली. अत्यंत शांत, संयमी आणि अभ्यासू नेता म्हणून त्यांची ओळख शहराच्या राजकारणात होती. मात्र, तत्कालीन राजकीय परिस्थितीनुसार त्यांनी आपली प्रतिमा 'आक्रमक नेता' अशी करण्याचा अनावश्यक प्रयत्न केला. परिणामी, त्यासाठी महाभ्रष्टाचार मोर्चा काढण्यात आला. महापालिकेतील एखाद्या निविदा प्रक्रियेबाबत पत्र काढणे आणि त्यासाठी आरोप-प्रत्यारोपाचा खेळ मांडणे, असा नवा पायंडा शहर राष्ट्रवादीत पहायला मिळाला. आपण दिलेल्या पत्रांचे पुढे काय झाले? याचा विचार गव्हाणे करताना दिसत नाहीत. अनेक विषयांमध्ये आयुक्त किंवा प्रशासनाने आपल्या अधिकारात निर्णय घेतले. विशेष म्हणजे, भामा आसखेड प्रकल्पातील जॅकवेल उभारणीच्या कामाबाबत न्यायालयात जावू, असा गव्हाणेंचा इशारा हवेत विरला. त्यामुळे पत्र काढणे, प्रशासन आणि भाजपावर आरोप करणे आणि विषय सोडून देणे...अशी 'फुसका बार' कार्यपद्धती अजित गव्हाणे आणि राष्ट्रवादीच्या हिताची नाही, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# 'चौथ्या स्तंभाने जबाबदारीचे भान ठेवावे'

## लागोपाठच्या तीन घटनांमुळे अजित पवार उद्विग्न

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि विरोधी पक्षनेते अजित पवार हे काल (शुक्रवार) नॉट रिचेबल झाल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं होतं. अजित पवारांनी दोन दिवसांसाठी पुण्यातील नियोजित कार्यक्रम रद्द केले होते. पवार कुठे गेले आहेत, याची माहिती शुक्रवारी रात्रीपर्यंत त्यांच्या निकटवर्तीयांसह पोलिसांनाही नव्हती. ते यापूर्वी २०१९ च्या विधानसभा निवडणुकींपूर्वी असेच अज्ञातवासात गेल्याने त्यांच्या शुक्रवारच्या कृतीची जोरदार चर्चा रंगली होती. मात्र, आज सकाळी पवार आणि त्यांच्या पत्नी सुनेत्रा यांच्या हस्ते खराडीमधील रांका ज्वेलर्सच्या शोरूमचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर पवार हे नॉट रिचेबल का होते?, यामागील सविस्तर माहिती अजित पवारांनी प्रसार माध्यमांना दिली. परंतु चौथ्या स्तंभाने जबाबदारीचे भान ठेवावे, असं म्हणत अजित पवारांनी प्रसार माध्यमांना सुनावलं.**



गेल्या काही दिवसांपासून सातत्याने महाराष्ट्रभर दौरे झाले. धावपळीत विश्रांती व्यवस्थित मिळाली नाही. दौऱ्याची दगदग, झोप व्यवस्थित न मिळाल्याने पित्ताचा त्रास वाढून तब्येत बिघडली. त्यामुळे दौरा सोडून डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधे घेऊन पुण्यातल्या जिजाई निवासस्थानी विश्रांती घेत होतो, अशी माहिती विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी देत माध्यमांनी 'नॉट रिचेबल'च्या चुकीच्या बातम्या दाखवल्यामुळे माझी विनाकारण बदनामी झाल्याची नाराजी व्यक्त करत यापुढे माध्यमांनी खात्रीकरुनच बातम्या दाखवण्याची सूचना माध्यमांना दिली.


माध्यमांवर अजितदादांचा रोष कशासाठी?

लागोपाठच्या तीन घटनांमुळे अजित पवारांनी प्रसार माध्यमांवर रोष व्यक्त केला. पहिली घटना म्हणजे मागील वर्षातील नोव्हेंबर महिन्यात शिर्डीत मंथन शिबिर झाल्यानंतर अजित पवार नॉट रिचेबल होते. त्यामुळे अजित पवार नेमके गेले कुठे? असा प्रश्न तेव्हाही राजकीय वर्तुळात उपस्थित करण्यात आला होता. परंतु पवारांनी मावळ येथे भाषण करताना याबाबत खुलासा केला.

पाच-सहा वर्षांपासून परदेशात जाण्याची संधी मिळाली नाही. संधी अनेकदा आली पण कामामुळे मला जाता आलं नाही. त्यामुळे ४ नोव्हेंबरला रात्री उशिरा मी फ्लाइटने परदेशी गेलो आणि १० तारखेला रात्री उशिराने आलो. सहा महिन्यांपूर्वीच हा दौरा ठरलेला होता. पण इथे माझ्यामागे मी नाराज असल्याच्या अफवा पसरवल्या गेल्या. दादांवाचून यांचं काय अडतं काय माहीत?

## कुठयेत झाडी कुठंय डोंगूर! वारजे परिसरात टेकड्या उद्ध्वस्त

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।



शहरात गेल्या २५ वर्षांमध्ये विकासकामे करताना सर्वाधिक घाव वारजे येथील वेगवेगळ्या टेकड्यांवर बसले आहेत. त्यामुळे या टेकड्या खिळखिळ्या झाल्याचे दिसते. विकासासाठी तोडलेल्या जागेत आता एकीकडे सिमेंटची जंगले उभी राहिली आहेत, तर दुसरीकडे टेकड्यांवर झोपडपट्टी वसली आहे. दगडखाणी, प्लॉटिंग, अनधिकृत बांधकामे यांनीही टेकड्यांचे लचके तोडले आहेत.

कालांतराने यातील काही जमिनीवर वनक्षेत्रासाठी आरक्षित झाली. टेकडीचा काही भाग राज्याच्या महसूल विभागाकडे आहे, तर काही भाग खासगी जमीनधारकांचा आहे.

**पौराणिक महत्त्व**

वारज्यात एका टेकडीवर म्हसोबाचे प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर म्हणजे चार गावांची वेस मानली गेली आहे. वारजे, कोथरूड, बावधन, भूगाव या चार गावांची वेस या म्हसोबाच्या मंदिराजवळ एकत्र येतात.

**वृक्षराजीऐवजी सिमेंटचे जंगल**

पुण्याच्या पश्चिमेला असणाऱ्या वारज्यातील टेकड्यांवर १९५० ते ६० पासून खऱ्या अर्थी विकासाचा दाब पडू लागला. या दरम्यान राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) सुरू झाली.

**पानशेतच्या पुरानंतर कोथरूड हे नवीन उपनगर वसलं.**

१९९८ मध्ये या टेकड्यांमधून मुंबई-बेंगळुरू हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ विकसित करण्यात आला.

पुणे २००० पासून वेगाने वाढू लागले. याचा सर्वाधिक परिणाम झालेला भाग म्हणजे वारज्यातील टेकड्या.

विकासाच्या नावाखाली झाडे कापली. जंगल तोडून त्या जागी सिमेंटचे जंगल उभे राहिले.

### इतिहास काय सांगतो?

**»वारजे येथील टेकड्यांच्या इतिहासाची १८०० पासूनची माहिती उपलब्ध आहे. हे सुरुवातीपासून गायरान होते. त्यामुळे परिसरातील शेतकरी त्यांची गुरे, मेंढ्या चरण्यासाठी या टेकड्यांवर आणत.**

# हिंगोलीत २०३०पर्यंत उभारणार 'लायगो इंडिया' वेधशाळा

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गुरुत्वीय लहरींच्या अभ्यासासाठी प्रस्तावित असलेल्या भारतातील 'लेझर इंटरफेरोमीटर ग्रॅव्हिटेशनल वेव्ह ऑब्झर्वेटरी' (लायगो इंडिया) या खगोलशास्त्रीय महाप्रकल्पाला केंद्रीय मंत्रीमंडळाने अंतिम मंजुरी दिली. महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्यातील औंढ्या नागनाथजवळ तब्बल २६०० कोटी रुपये खर्चून सन २०३०पर्यंत ही वेधशाळा बांधण्यात येणार आहे. गुरुत्वीय लहरींच्या जागतिक पातळीवर सुरू असलेल्या संशोधनास चालना मिळतानाच भारतातही अत्याधुनिक तंत्रज्ञानाची निर्मिती 'लायगो इंडिया'मुळे शक्य होणार आहे.**

अमेरिकेतील 'लायगो'च्या जुळ्या वेधशाळांनी लावलेल्या गुरुत्वीय लहरींच्या पहिल्या शोधानंतर भारतात तिसरी वेधशाळा उभारण्यासाठी केंद्र सरकारने २०१६ मध्ये तत्त्वतः मंजुरी दिली होती. प्रकल्पाच्या नियोजनासाठी अणुऊर्जा आयोग आणि विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालयाच्या विविध संस्थांमार्फत प्राथमिक निधीही उपलब्ध झाला. त्यातून गुरुत्वीय लहरींच्या वेधशाळेसाठी आवश्यक यंत्रणांची प्रारूपे तयार झाली. हिंगोली जिल्ह्यातील औंढ्या नागनाथजवळील १७४ एकर जागा महाप्रकल्पासाठी अधिग्रहित करून प्रशासकीय



इमारतही उभी राहिली. मात्र, सन २०२० मध्ये आलेल्या करोनामुळे प्रकल्पाची अंतिम मंजुरी लांबत गेली. गुरुवारी झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत लायगो इंडियाच्या उभारणीसाठी २६०० कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली.

**'दशकाच्या प्रयत्नानंतर यश'**

'लायगो इंडिया' प्रकल्पात महत्त्वाची भूमिका निभावणारे रामन रिसर्च सेंटरचे संचालक प्रा. तरुण सौरदीप म्हणाले, 'भारतीय शास्त्रज्ञांच्या एका दशकाच्या प्रयत्नांना आज यश आल्याचा आनंद वाटतो. गुरुत्वीय लहरींच्या अभ्यासात सुरुवातीपासूनच भारताचा महत्त्वाचा सहभाग राहिला आहे. २०१७ च्या नोबेल विजेत्या संशोधनातही भारतातील अनेक शास्त्रज्ञ सहभागी होते. देशात गुरुत्वीय लहरींची अत्याधुनिक वेधशाळा उभारण्याची संधी संशोधन संस्थांप्रमाणेच उद्योगांनाही मिळणार आहे.'

### ... असा असेल 'लायगो इंडिया' प्रकल्प

**» अमेरिकेतील लायगोच्या दोन वेधशाळांनंतर तिसरी वेधशाळा उभारण्यासाठी पृथ्वीवर अमेरिकेच्या विरुद्ध बाजूस असणाऱ्या भारताची निवड करण्यात आली.**

**» वेधशाळेसाठी निश्चित करण्यात आलेली औंढ्या नागनाथजवळील जागा अमेरिकेतील जागांपेक्षा दहा पटींनी अधिक स्थिर (हादऱ्यांचे प्रमाण) आहे.**

**» अतिदूर अवकाशातील ब्लॅकहोल, न्यूट्रॉन तारे यांच्या संमीलनातून अवकाश आणि काळाच्या पटलावर निर्माण झालेल्या तरंगांचा (गुरुत्वीय लहरी) वेध घेण्याचे काम वेधशाळा करील.**

**» पुण्यातील इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर अ‍ॅस्ट्रोनॉमी अँड अ‍ॅस्ट्रोफिजिक्स (आयुका), इन्स्टिट्यूट ऑफ प्लाझ्मा रिसर्च (गांधीनगर) आणि राजा रामण्णा सेंटर फॉर अ‍ॅडव्हान्स टेक्नॉलॉजी (इंदौर) या संस्थांच्या पुढाकाराने चार किलोमीटर लांबीचे दोन बोगदे (टनेल) असणारी वेधशाळा उभारण्यात येईल.**

# संत तुकोबांच्या पालखीचे 10 जूनला प्रस्थान!

## 338 व्या पालखी सोहळ्याचा कार्यक्रम : आषाढी वारीची संस्थानकडून तयारी

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**आषाढी वारीसाठी संत तुकाराम महाराज पालखी सोहळा १० जूनला देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे, अशी माहिती संत तुकाराम महाराज संस्थानचे पालखी सोहळाप्रमुख संजय महाराज मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यंदाच्या पालखी सोहळा प्रमुखपदी संजय महाराज मोरे, भानुदास महाराज मोरे, अजित महाराज मोरे यांची निवड संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी शनिवारी जाहीर केली.**

संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, पालखी सोहळा प्रमुख भानुदास महाराज मोरे, अजित महाराज मोरे, विश्वस्त विशाल महाराज मोरे व इतर उपस्थित होते. संजय महाराज मोरे म्हणाले, “यंदा ३३८ वा पालखी सोहळा आहे. पहिल्या दिवशी पालखी देहूतील इनामदारवाड्यात मुक्कामी आहे. यंदा पालखी मार्गावर काही किरकोळ बदल केले आहेत. पूर्वी इंदापूर येथील शाळेत पालखी सोहळा मुक्कामी असायचा. यावर्षी इंदापूरमधील नव्याने तयार केलेल्या आयटी मैदानावर पालखी सोहळ्याचा मुक्काम असणार आहे. पालखी सोहळा १० जूनला देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. ११ जूनला सकाळी इनामदारवाड्यातून आकुर्डीकडे पालखी सोहळा मार्गस्थ होईल. आकुर्डी येथील विठ्ठल मंदिरात सायंकाळी पालखी सोहळ्याचा मुक्काम आहे. १२ जूनला पहाटे पालखी सोहळ्याचे पिंपरीतील एच. ए. मैदान, कासारवाडी, शिवाजीनगरमार्गे पुण्यातील नानापेठ येथील विठ्ठल मंदिरात आगमन होईल.

१३ जूनला पालखी सोहळा नानापेठ येथील निवडुंगा विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मुक्कामी असेल. १४ जूनला सकाळी पालखी सोहळा हडपसरमार्गे लोणीकाळभोर येथे मुक्कामासाठी पोचणार आहे. १५ जूनला सोहळा यवत येथील भैरवनाथ मंदिरात मुक्कामी असेल. १६ जूनला वरवंड येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मुक्कामी असेल. १७ जूनला वरवंड येथून सोहळा उंडवडी गवळ्याची येथे मुक्कामासाठी असेल. १८ जूनला बऱ्हाणपूर, मोरेवाडी मार्गे पालखी सोहळा बारामती येथील शारदा विद्यालयाच्या पटांगणात मुक्कामी असेल. १९ जूनला सणसर येथील पालखी तळावर मुक्कामाला असेल. २० जूनला सणसरमार्गे पालखी सोहळा बेलवंडी येथे पोचेल. बेलवंडी येथे पहिले गोल रिंगण होईल. त्यानंतर आंथुर्णे येथील पालखी तळावर मुक्कामी असेल. २१ जूनला अंथुर्णे येथून शेळगाव फाटा, गोतंडी मार्गे पालखी सोहळा निमगाव केतकी येथे पालखी तळावर मुक्कामी असेल. २२ जूनला निमगाव केतकीहून सोहळा इंदापूरला येईल. इंदापूर येथे दुसरे गोल रिंगण होईल. त्यानंतर इंदापूर येथे नव्याने तयार केलेल्या पालखीतळावर सोहळ्याचा मुक्काम आहे. २३ जूनला पालखी सोहळा इंदापूरहून सराटी येथे मुक्कामी पोचेल.

२४ जूनला सराटी येथे नीरा स्नान झाल्यानंतर अकलूज येथे माने विद्यालयात आगमन होईल. त्याठिकाणी तिसरे गोलरिंगण होणार आहे. २५ जूनला सोहळा अकलूजहून माळीनगर येथे पोचल्यानंतर तेथे पहिले उभे रिंगण होणार आहे. त्यानंतर पालखी सोहळा बोरगाव येथे मुक्कामी आहे. तसेच, दि. २६ जूनला दुपारी तोंडले बोंडले येथे सोहळा पोचणार आहे. याठिकाणी पालखी सोहळ्याचा धावा असतो. त्यानंतर पालखी सोहळा पिराची कुरोली येथे मुक्कामी आहे. २७ जूनला पालखी सोहळ्याचे बाघडवस्ती, भंडी शेगावमार्गे बाजीराव विहीर येथे आगमन होईल. त्याठिकाणी दुसरे उभे रिंगण होणार आहे. त्यानंतर पालखी सोहळा वाखरी तळावर मुक्कामी असेल.



### दि. 3 जुलै रोजी पंढरपूरहून देहूकडे परतीचा प्रवास...

दि. २८ जूनला दुपारी एकनंतर पंढरपूरकडे मार्गस्थ होईल. उभे रिंगण झाल्यानंतर पालखी सोहळा पंढरपूरातील नवीन संत तुकाराम महाराज मंदिरात मुक्कामी आहे. २९ जूनला आषाढी वारी दिवशी नगरप्रदिक्षणा होईल. ३ जुलै दुपारपर्यंत पंढरपूर येथे श्री संत तुकाराम महाराज नवीन मंदिर प्रदक्षिणा मार्ग येथे मुक्कामी आहे. पालखी सोहळ्याचा परतीचा प्रवास ३ जुलैपासून पंढरपूर ते देहूकडे असणार आहे, असे पालखी सोहळा प्रमुख भानुदास महाराज मोरे यांनी सांगितले.



# वॉशिंग सेंटरवर आता महापालिकेचा ‘वॉच’

## प्रशासन आक्रमक: पिण्याचे पाणी वापरणाऱ्यांवर कारवाई होणार

।पुणे पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पवना धरणातील पाणीपातळी झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे भर उन्हाळ्यामध्ये पिंपरी- चिंचवडकरांना पाणीकपातीच्या संकटाचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. पाण्याचा अपव्यय होऊ नये, यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. पाण्याचा अतिरिक्त वापर करणारे नागरिक तसेच वाहन धुणे, वॉशिंग सेंटरला पिण्याचे पाणी वापरणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.**

शहराला मावळ तालुक्यातील पवना धरणामधून पाणीपुरवठा केला जातो. शहरामध्ये गेल्या साडेतीन वर्षापासून एक दिवसा आड पाणीपुरवठा सुरू आहे. धरणातील पाणीपातळी ४७ टक्क्याखाली आली आहे. एप्रिल आणि मे महिन्यामध्ये कडक ऊन असणार आहे. त्यामुळे धरणातील पाण्याची आणखी वाफ होण्याची शक्यता आहे. परिणामी, धरणातील पाण्याची पातळी आणखी खालावेल, अशा परिस्थितीमध्ये शहरामध्ये पाणी कपातीचे संकट ओढावू शकते. त्यामुळे उपलब्ध पाणी जपून वापरणे आवश्यक आहे. मात्र, अनेक नागरिक महापालिकेच्या नळाला पाणी आल्यानंतर वाहने धुणे तसेच रस्त्यावर पाणी सोडून देतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होतो, तर वॉशिंग सेंटर चालक पिण्याचे पाणी व्यवसायासाठी वापरतात. पिण्याचे पाणी वापरल्याने मोठ्या प्रमाणावर पाण्याची नासाडी होते. त्यामुळे अशा वॉशिंग सेंटर चालकांवर महापालिका कारवाई करणार आहे. जे व्यावसायिक पिण्याचे पाणी वाहने धुण्यासाठी वापरतात त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे.



> “निघोजे येथील इंद्रायणी नदीतून १०० एमएलडी अतिरिक्त पाणी शहराला मिळणार आहे. त्यासाठी चिखली येथे जलशुध्दीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, त्याचे उद्‌घाटन झाले नसल्याने अद्याप अतिरिक्त पाणी शहरवासीयांना मिळाले नाही.धरणामध्ये जुलै महिन्यापर्यंत पुरेल एवढे पाणी आहे. मात्र, पिण्याच्या पाण्याचा अपव्यय होणे चांगली बाब नाही. अनेक नागरिक विनाकारण वाहने धुतात, तसेच रस्त्यावर पाणी सोडून देत असल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. त्यामुळे पाण्याची नासाडी होते. अशाप्रकारे पाण्याची नासाडी करणाऱ्या नागरिकांवर यापुढे महापालिका प्रशासन कारवाई करणार आहे. त्यामुळे नागरिकांनी उपलब्ध पाणी जपून वापरावे.
> – प्रदीप जांभळे, अतिरिक्त आयुक्त

## संपादकीय »

# माणुसकीच्या खांडोळ्या

***राजधानी दिल्लीत उघडकीस आलेल्या अमानुष हत्येच्या प्रकरणाने कुठल्याही सामान्य नागरिकाच्या अंगावर शहारे आल्याशिवाय राहणार नाहीत. २***

८ वर्षे वयाच्या तरुणाने आपल्या मैत्रिणीची गळा दाबून हत्या करुन तिच्या देहाचे पस्तीस तुकडे करुन ते फ्रिजमध्ये ठेवले आणि एकेक करुन शांतपणे नष्ट करण्याचा खटाटोप केला. ही हत्या मे महिन्यातच झाली होती आणि मैत्रिणीच्या मृतदेहाचे खंडही त्याने प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये भरुन बरेच दिवस जपून ठेवले. त्यातले काही चक्क कुत्र्यांना खायला घातले. त्याच फ्रिजमध्ये तो आपले एरवीचे खाद्यपदार्थही ठेवत होता. बेपत्ता तरुणीचा तपास करणारे पोलिस त्याच्या घरापर्यंत पोचल्यावर मात्र त्याने थंडपणे आपल्या अमानुष कृत्याचा तपशील उघड केला. माणूस इतक्या नराधम पातळीपर्यंत कसा पोचतो? कुठल्या संप्रेरकांचे अतिरेकी उत्तेजन किंवा अभाव त्याला या नीचतम पातळीला नेते? माणसाच्या मेंदूतच काही गंभीर बिघाड सुप्तावस्थेत असतो आणि प्रसंगापरत्वे ती विकृती पृष्ठभागावर तरंगू लागते? नात्यागोत्यांचे बंध इतक्या टोकाला जाण्याची कारणे काय? जगण्यातले ताणतणाव, स्वातंत्र्याबद्दलच्या भलभलत्या कल्पना, समाजमाध्यमांचा कल्लोळ यामुळे आपल्या भाव-भावनांचेच बकालीकरण होत आहे का? असे अनेक प्रश्न यातून निर्माण होतात. पण हे बहुतेक प्रश्न मानसशास्त्राच्या पातळीवरचे आहेत. तूर्त पोलिसांचा तपास वेगळ्याच धाग्यांच्या शोधात आहे. उदाहरणार्थ, या हत्या-प्रकरणात अंमली पदार्थांचा सहभाग आहे का? 'कॅनिबलिझम' म्हणजेच नरमांसभक्षणाचा हिंस्त्र पैलू यात असावा का? सुमारे २७ वर्षांपूर्वी तंदूर हत्याकांडाने दिल्ली शहर हादरले होते. नैना साहनीच्या मृतदेहाचे तुकडे करुन तिच्या पतीने हॉटेलातील तंदूरभट्टीत ते नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. जाहिरात क्षेत्रातील व्यावसायिक नीरज ग्रोव्हर याची हत्या करुन मृतदेहाचे तुकडे करुन विल्हेवाट लावल्याच्या आरोपाखाली प्रसिद्ध मॉडेल मारिया सुसाईराजला अटक झाली होती. कुख्यात गुंड विलास पालांडेने २०१२ मध्ये सिनेदिग्दर्शक करण कक्करची अशीच देहाची खांडोळी करुन हत्या केली होती. २०१९ मध्ये मुंबईत बेनेट रिबेलो या संगीतकारास त्याच्या दत्तक मुलीने, आपल्या बॉयफ्रेंडच्या मदतीने संपवून त्याच्या मृतदेहाचे तुकडे माहीमच्या समुद्रात फेकले होते. गेल्या ऑगस्ट महिन्यात पुण्यानजीक थेऊरजवळ एका वृद्धेचे तुकडे करुन हत्या केल्याच्या आरोपाखाली मुलगा आणि नातवाला अटक झाली होती. गेल्याच आठवड्यात चंद्रपूरनजीक दुर्गापूर येथे एका गुंडाला विरोधी टोळीतील काही गुंडांनी भर रस्त्यात खतम केले होते.

# पालकांनो, बोलते व्हा...




कुमारवयात पदार्पण करत असलेली मुले-मुली आपल्या व्यक्तिमत्त्वाबद्दल तीव्र संवेदनशील असतात. दिसणे, पेहरावाबाबत ते सदैव जागरूक राहतात. एकंदरच स्व-प्रतिमेबाबत त्यांच्याशी चर्चा करताना स्वभाव, लिंगभाव, रंग-रूप, उंची, जाड-बारीक असणे यांबाबत निरोगी शरीर, अनुवंशिकता व समाजात असलेल्या सौंदर्याच्या चुकीच्या परिभाषा लक्षात आणून द्यायला हव्यात.

लैंगिकता, स्त्री-पुरुष बाह्य व आंतर शरीररचनेची, लैंगिक अवयवांची ओळख त्यांना करून द्यायला हवी. नैसर्गिक भिन्नताही सकारण समजावून सांगायला हवी. यात आपण दुसऱ्यांच्या नजरेत कसे दिसतो, यापेक्षा स्वत:च्या नजरेत कसे आहोत, हे महत्त्वाचे आहे. 'मी जशी आहे तशी मला आवडते, स्वत:वर प्रेम करते,' हा आत्मविश्वास पालकांनी मुलींच्या मनात तयार करायला हवा. 'तू आम्हाला आवडतेस / आवडतोस आणि आमचे तुझ्यावर प्रेम आहे,' हे पालकांनी नजरेतून आणि वागण्यातून पाल्यांना वारंवार सांगावे.

बाह्य सौंदर्यापेक्षा 'माणूस' म्हणून असणारे व्यक्तिमत्त्वातले आंतरिक सौंदर्य जास्त महत्त्वाचे आहे. त्यानेच बाह्य सौंदर्यही खुलते. शरीराची सुंदरता वयानुसार ओसरू लागते; पण 'चांगले मन असलेले संवेदनशील माणूसपण' कधीच कमी होत नाही, हे लक्षात घ्यायला हवे. मुलगा-मुलगी फरक न करता, दोघांनाही एकमेकांच्या शरीराची व लैंगिकतेची ओळख करून द्या. प्रत्येक व्यक्ती वेगळी असते; त्यामुळे प्रत्येकाचा वयात येण्याचा कालावधीही वेगवेगळा असतो. एखादे मूल आठ ते दहा वर्षांचे असताना ही प्रक्रिया सुरू होते, तर एखाद्यासाठी १३ वर्षांनंतरही ही प्रक्रिया सुरू होऊ शकते. हे बऱ्याचदा आरोग्य व अनुवंशिकता यानुसार असते. पालकांना बालकांच्या वाढीसंदर्भात प्रश्न असतील, तेव्हा डॉक्टरांशी जरूर संपर्क साधावा.

मुलीची 'स्त्री' म्हणून होत असलेली शरीराची जडणघडण व कार्य, वयात येत असताना तिच्यात आई होण्यासाठीची तयारी सुरू होणे, स्तन वाढणे, मासिक पाळी येणे, बाळाचे वजन पेलता यायला हवे म्हणून कमरेच्या हाडांची असलेली रचना;



त्यामुळे पार्श्वभाग मोठा असणे, गर्भाशयाचे कार्य, हे वयानुरूप समजावून सांगितल्यास शरीराबद्दलची कमीपणाची भावना, पाळीच्या अनुषंगाने होणारे भावनिक व शारीरिक त्रास समजून घ्यायला, स्वीकारायला मदत होईल.

वयात येताना मुलग्यांमध्ये दाढी-मिशी येणे, आवाज फुटणे, खांदे रुंद होणे, झोपेत होणारे वीर्यपतन हे बदल होत असतात. दोघांमध्येही समान असणाऱ्या बाबी म्हणजे काखेत व जांघेत येणारे केस, लैंगिक अवयवांचे नाजूकपण व त्यांची स्वच्छता, योग्य आहार, व्यायाम या सगळ्याच्या अनुषंगाने पालकांनी माहिती द्यायला हवी. एकूणच, पाल्याच्या लैंगिकतेशी निगडित समज, गैरसमज, भीती कमी करण्याची जबाबदारी पालकांची आहे.

विषय कसा काढायचा?

या मुद्द्यांवर कसे बोलायचे, हा प्रश्न नेहमीच पडतो. पालकांनी मनातली लाज बाजूला ठेवली, तर सकारात्मक व वैज्ञानिक माहिती मिळू शकते. त्याकडे 'शिक्षण' म्हणून बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास, नक्कीच अवघड नाही. त्या त्या वयात आई-वडिलांनी पाल्यांशी मोकळेपणाने संवाद साधावा. लैंगिकतेबाबतच्या सर्व पातळीवरच्या चर्चा व प्रश्नांसाठी जागा तयार करावी.

मैत्री-आकर्षण-प्रेम यांमध्ये फरक करणे; तसेच पौगंडावस्थेत मानसिक पातळीवर होणारे बदल मुला-मुलींना गोंधळात टाकणारे असतात. भिन्नलिंगी व्यक्तींबद्दलचे विचार अचानक बदलायला लागतात. मैत्री, आकर्षण, प्रेम या भावनांमधील सीमारेषा धूसर असल्याने, त्या समजून घेताना त्रेधातिरपीट उडते. जाहिराती, मालिका, चित्रपट यांतून मिळणाऱ्या चुकीच्या संदेशामुळे मुले 'मर्दानगी'च्या चौकटीत अडकतात व आयुष्य धोक्यात घालतात. नैसर्गिक भावनांनुसार आपल्याला 'बॉयफ्रेंड' असावा, कुणाला तरी आपण आवडावे, यासाठी मुलींची असलेली धडपड व मासिक पाळी आल्यानंतर घरातून घातल्या जाणाऱ्या मर्यादा, घरात-घराबाहेर असलेले असुरक्षित वातावरण या विचित्र कचाट्यात मुली अडकतात. घरातील मोठ्यांशी या विषयावर बोलायलाही पाल्य बिचकतात.

# मानसिक आरोग्याचा विमा अपुराच!

**अनेकदा शारीरिक आजारांवरील उपचारांच्या विम्याची रक्कम मिळवताना एवढा खटाटोप करावा लागतो, की मानसिक आजारांनाही विमा संरक्षण मिळू शकते, हेच कल्पनेच्या पलीकडचे वाटते.**

मानसिक आजारांना खासगी कंपन्या आणि सरकारच्या पातळीवरही विमा संरक्षण दिले जाऊ लागले आहे, मात्र ते खरोखरच प्रभावी आहे का, अशा स्वरूपाचा विमा उतरवताना संबंधित योजना कोणत्या निकषांवर पडताळून पाहणे गरजेचे आहे, हे माहीत असणे महत्त्वाचे ठरते.

एरवी नेहमीच दुर्लक्षित राहिलेले मानसिक आरोग्याचे महत्त्व कोविडकाळात अधोरेखित झाले. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालनुसार, करोना साथीच्या पहिल्या वर्षांत, नैराश्य आणि चिंता या मानसिक आजारांचे प्रमाण २५ टक्क्यांहून अधिक वाढले. याघडीला जगात मानसिक आजारांचे एक अब्ज रुग्ण आहेत. त्यातील ७० टक्क्यांहून अधिक रुग्णांना आवश्यक ती मानसिक आरोग्यसेवा आणि मदत मिळत नाही. भारताच्या बाबतीत सांगायचे झाले तर, 'इंडियन सायकियाट्री सोसायटी'च्या २०२० मधील सर्वेक्षणानुसार



सामान्यपणे ४० टक्क्यांहून अधिक भारतीय मानसिक आजाराला बळी पडतात. कोविड साथीनंतर हे प्रमाण आणखी वाढले आहे.

मानसिक आजारांवरील उपचार अधिक खर्चीक आहेत. आधीच कोमात असलेल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत मोफत आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्यसेवा मिळणे हे सध्या तरी स्वप्नवत वाटावे एवढे कठीण आहे. नाइलाजाने रुग्णांना खासगी दवाखान्यांत जावे लागते. खासगी दवाखान्यांत मानसिक आजारांवर उपचार घेताना एका सत्रासाठी साधारण ८०० ते पाच हजार रुपये खर्च येतो. रुग्णास त्याच्या आजाराच्या तीव्रतेनुसार कमीतकमी सहा ते जास्तीत जास्त २० सत्रे उपचार घ्यावेच लागतात. याव्यतिरिक्त औषधे, तपासण्या इत्यादींसाठी वेगळा खर्च करावा लागतो. गेल्या १५ वर्षांत खासगी कंपन्यांनी आरोग्य विमा योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली असली, तरी मानसिक आरोग्य क्षेत्रासाठीची गुंतवणूक अत्यंत नगण्य आहे. २०१७ साली संमत झालेल्या 'मानसिक आरोग्यसेवा कायद्या'त विमा योजनेचा प्रथमच उललेख करण्यात आला. 'प्रत्येक विमा कंपनीने शारीरिक आजारांच्या उपचार-विम्यासारखीच मानसिक आजारांच्या उपचारांसाठी वैद्यकीय विमा योजना आणि त्यासाठीची तरतूद केली पाहिजे' असे कायद्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.२०१८ आणि २०२० मध्ये 'विमा नियामक आणि विकास प्राधिकरणा'ने (आयडीआरएआय) सर्व विमा कंपन्यांना या नियमाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अनेक जिल्ह्यात अवकाळी पावसाचा कहर!

## » घरांचं नुकसान, हातातोंडाशी आलेले पीक उद्ध्वस्त



। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील काही जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी अवकाळी पाऊस (UNSEASONAL RAIN) सुरुच आहे. तर काल झालेल्या पावसामुळे पुरती दाणादाण उडवली असून शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह झालेल्या पावसामुळे घरांसह पिकांचं मोठं नुकसान झालं. हवामान विभागाने मराठवाडा आणि विदर्भात ऑरेंज अलर्ट जारी केला होता. तर तळकोकणात दोन दिवस अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवला होता

**यवतमाळ**

हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण भागात अवकाळी पावसाने चांगलाच धुमाकूळ घातला असून हा पाऊस शेतकऱ्यांच्या जीवावर उठला आहे. शेतातील कांदा, गहू पिकाचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी हतबल झाला आहे. काल रात्रीच्या सुमारास आर्णी तालुक्यातील महागाव कसबा, बाभूळगाव तालुक्यातील राणी अमरावती, कोपरा, जूनुना या भागात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस आला. या पावसाने हरभरा, गहू, मिरची, कांदा, आंबा आणि भाजीपाला पिकाचे नुकसान झाले. काढणीला आलेला शेतातील उभा गहू जमिनीवर अक्षरशः झोपला. त्यामुळे गव्हाच्या उत्पादनात कमालीची घट होणार आहे. सोबतच गव्हाची प्रत सुद्धा खालावणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षाप्रमाणे भाव सुद्धा मिळणार नाही. यात शेतकऱ्यांचं मोठं आर्थिक नुकसान होणार आहे. जवळपास दीड तास झालेल्या या पावसाने शेतकऱ्यांच्या डोळ्यात अक्षरशः पाणी आणले. अवकाळी प्पावसाने झालेल्या नुकसानाची भरपाई देण्यात यावी अशी या परिसरातील शेतकऱ्यांची मागणी आहे.

**अहमदनगर**

अहमदनगर शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी काल रात्री विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. पारनेर, शेवगाव, नेवासा, श्रीगोंदा, नगर तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसाचा शेतकऱ्यांना फटका बसला आहे. या पावसामुळे गहू, कांदा, हरभरा, कलिंगड, मका पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पारनेर तालुक्यात खडकवाडी येथे झालेल्या गारांच्या पावसामुळे कलिंगड पीक अक्षरशः उद्ध्वस्त झाले आहे. प्रशासनाने पंचनामे सुरु केले आहेत. पंचनामे पूर्ण झाल्यानंतरच नुकसानीची आकडेवारी समोर येईल.

**हिंगोली**

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, वसमत, सेनगाव, कळमनुरी, औंढा या भागामध्ये अवकाळी पाऊसाने हजेरी लावली आहे. कालपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. मात्र अचानक झालेल्या पावसाने उकड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. परंतु या अवकाळी पावसामुळे भाजीपाला, फळबागांसह हळद उत्पादक शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे.

**कोकण**

तळकोकणात सलग दोन दिवस पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे आंबा, काजू, कोकम, जाभूळ पिकांना फटका बसला आहे. अवकाळी पाऊस पडल्याने जाभूळ गळून मातीमोल झाली आहेत. तर अवकाळी पाऊस पडल्याने जाभुळात जंतू तयार होणार त्यामुळे ते फेकून द्यावं लागणार आहे. आंब्यातही पावसामुळे जंतू तयार होण्याची भीती शेतकऱ्यांना वाटत आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वत्र ढगाळ वातावरण असल्याने जिल्ह्यातील आंबा बागायतदार चिंतातूर झाले आहेत.

**बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यात काल दुपारपासून अवकाळी पावसाने कहर केला आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाने हजेरी लावली तर बुलढाणा तालुक्यात काल दुपारी गारपीट सुद्धा झाली. यात खामगाव, नांदुरा, चिखली, बुलढाणा तालुक्यात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. तर रात्री सुद्धा मुसळधार पाऊस झाल्याने अनेक भागातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता. बुलढाण्यासह परिसरात गारपीट झाल्याने फळ पिकांचे आणि कांदा पिकांचे नुकसान झाले. अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे घरावरील पत्रे उडाल्याने संसार उघड्यावर पडले आहेत. पावसामुळे जनजीवन प्रभावित झाले आहे.

**सांगली**

सांगली जिल्ह्यात झालेल्या पावसाने तासगाव तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सुनील धाबुगडे या शेतकऱ्याने बेदाण्यासाठी रॅकवर टाकलेली द्राक्षे कालच्या पावसात भिजून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तर नंदकुमार या शेतकऱ्याच्या बागेतील द्राक्ष विक्री न झाल्याने कालच्या पावसात द्राक्षचे देखील नुकसान झाले आहे.

महावितरण कडून वीज बिल भरण्यासाठी तगादा लावला जात आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांने लाईट बिल कसे भरावे असा प्रश्न उपस्थित करत आता सरकारने तातडीने पंचनामे करुन ठोस मदत द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# मुंबईत तीन अतिरेकी

।मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



मुंबईमधून धक्कादायक बातमी समोर येत असून, मुंबईमध्ये तीन दहशतवादी आल्याची माहिती देणारा फोन कॉल मुंबई पोलीस नियंत्रण कक्षात आल्याने खळबळ उडाली आहे. दुबईवरुन शुक्रवारी (7 एप्रिल) पहाटे तीन अतिरेकी मुंबईत आल्याचं आणि त्यांचा संबंध पाकिस्तानशी असल्याचा कॉलरने दावा केला आहे. या फोन कॉलने मोठी खळबळ उडाली असून, मुंबई पोलीस अलर्ट झाले आहेत. तर पुढील तपास सुरु करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तीन अतिरेकी मुंबईत आल्याचा मुंबई पोलीस नियंत्रण कक्षात फोन आला आहे. दुबईवरुन शुक्रवारी पहाटे तीन अतिरेकी आल्याचे आणि त्यांचा संबंध पाकिस्तानशी असल्याचा दावा फोन कॉल करणाऱ्या व्यक्तीने केला आहे. तर एकाचे नाव मुजीब सय्यद असून त्याचा मोबाईल नंबर आणि गाडीचा नंबर देखील पोलिसांना संबंधित कॉलरकडून देण्यात आला आहे. तसेच या तीनही व्यक्तींचा दोन नंबरचा धंदा असल्याचा दावाही कॉलरने केला आहे. त्यामुळे पोलिसांकडून या संबंधी चौकशी करण्यात येत आहे.

**काय आहे प्रकरण...**

मुंबई पोलीस नियंत्रण कक्षाला येणाऱ्या फोन कॉलची तपासणी पोलिसांकडून करण्यात येते. दरम्यान शुक्रवारी मुंबई पोलीस नियंत्रण कक्षाला राजा ठोंगे नावाच्या व्यक्तिने फोन करुन मुंबईत तीन दहशतवादी आल्याची माहिती दिली. तसेच हे तीनही व्यक्ती दुबई येथून आले असून, त्यांचा संबध पाकिस्तानशी असल्याचा दावा केला. विशेष म्हणजे फोन करणाऱ्या व्यक्तिने एक विशेष नाव आणि नंबर देखील दिला आहे. सोबतच एका गाडीचे नंबर देखील दिला आहे.

# कधी रामाच्या, कधी अयोध्येच्या नावानं राजकारण

## » मूळ प्रश्न सोडविण्यासाठी राज्यकर्त्यांना वेळ नाही; पवारांचे टीकास्त्र

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



राज्यकर्त्यांच्या मनात फक्त एकच आहे. कधी रामाच्या नावाने, कधी आणखी कुणाच्या नावाने, कधी अयोध्येच्या नावाने राजकारण केलं जातं आहे. जनतेचे मूळ प्रश्न वगळून, धर्म, जात यावर आधारित एक वेगळं सामाजिक चित्र निर्माण करणे आणि कष्टकरी बांधव मूलभूत प्रश्न यापासून बाजूला कसा राहील, याची काळजी घेतली जात आहे, अशी घणाघाती टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे.

नाशिक येथे हिंद मजदूर सभा या राष्ट्रीय कामगार संघटनेला 75 वर्षे पूर्ण होत असून त्यानिमित्त अमृत महोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमात शरद पवार बोलत होते. ते यावेळी म्हणाले की, आज देशात महागाई, बेरोजगारी, नोकरी यांचा प्रश्न आहे. या प्रश्नांसाठी सत्ता वापरली पाहिजे, याची अपेक्षा राज्यकर्त्यांकडून आहे. मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी सत्ता वापरावी, मात्र यासाठी राज्यकर्त्यांना वेळ नसल्याचे शरद पवार म्हणाले.

शरद पवार पुढे म्हणाले की, देशाच्या अर्थव्यवस्थेला एक प्रकारचे स्थैर्य देण्याचे काम तुमच्या कष्टामुळे सुरू आहे. हे काम अशाच पद्धतीने चालू राहावे, यासाठी माझी साथ आहे. एक काळ असा होता की, महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये कष्टकरी लोकांची संख्या असायची. तसेच एकेकाळी मुंबई शहर देशाची औद्योगिक राजधानी होती. मात्र आज मुंबईचा उल्लेख औद्योगिक राजधानी म्हणून कुणी करत नाही. कदाचित औद्योगिक केंद्र म्हणत असतील. मुंबई शहरात 110-115 टेक्सटाइल मिल होत्या. गिरणगावात सकाळचा भोंगा झाला की आमचा कष्टकरी बांधव कामाला जायचा. दुपारची सुट्टी झाली की पुन्हा घरी जायचा. त्यावेळी कुठेही नजर टाकली की कष्टकरी बांधवांची चाळ दिसायची.

### ...म्हणून हा काळ जागे राहण्याचा आहे!

» सत्ता कुणाचीही असली तरी जनतेचे मूलभूत प्रश्न सोडविणे हे राज्यकर्त्यांचे काम असते. मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी सत्तेचा वापर होणं आवश्यक आहे. मात्र आजच्या स्थितीवरून आ दिसतंय की यासाठी त्यांना वेळ नाही. त्यांच्या मनात फक्त एकच आहे. कधी रामाच्या नावाने, कधी आणखी कुणाच्या नावाने, कधी अयोध्या याच्या नावाने मूळ प्रश्न वगळून, धर्म, जात यावर आधारित एक वेगळं सामाजिक चित्र निर्माण करणे आणि कष्टकरी बांधव मूलभूत प्रश्न यापासून बाजूला कसा राहील, याची काळजी घेतली जात आहे. म्हणून हा काळ जागे राहण्याचा आहे. आज तुमच्या डोक्यावर लाल टोपी पहिली, म्हणून बरं वाटलं. सगळे प्रश्न बाजूला टाकून, भलत्या दिशेने समाज नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र तुम्ही देशासाठी काम करता. तुमचं भवितव्य उज्ज्वल आहे. तुम्ही एकी ठेवावी, असा सल्ला शरद पवार यांनी दिला.

# कर्नाटकात दुधाच्या 'नंदिनी' विरुद्ध 'अमूल' ब्रँडचा संघर्ष पेटला?

। बेंगळुरू । महाईन्यूज ।



कर्नाटक निवडणुकीत अमूल आणि नंदिनी दुधाच्या ब्रँडची तुलना केली जात असून, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी शनिवारी या मुद्द्यावर पक्षाच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. नंदिनी हा अमूलपेक्षा चांगला ब्रँड असल्याचे ते म्हणाले. कर्नाटकातील दूध आणि शेतकऱ्यांचे रक्षण केले जाईल, असेही ते म्हणाले.

एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना काँग्रेस नेते डीके शिवकुमार यांनी गुजरातमधील डेअरी सहकारी कंपनी अमूलच्या कर्नाटक डेअरी मार्केटमध्ये प्रवेशावर टीका केली. आम्हाला आमच्या दुधाचे आणि शेतकऱ्यांचे रक्षण करायचे आहे. आमच्याकडे आधीच 'नंदिनी' डेअरी आहे जी अमूलपेक्षा चांगला ब्रँड आहे. आम्हाला अमूलची गरज नाही. आमचं पाणी, आमचं दूध आणि आमची माती भक्कम आहे, असही ते म्हणाले.

कर्नाटक मिल्क फेडरेशन (केएमएफ) राज्यात 'नंदिनी' या ब्रँड नावाने दूध आणि दही विकते. अमूलने बुधवारी बेंगळुरूमध्ये आपल्या ब्रँडचा टीझर लाँच केला, ज्यात म्हटले की अमूल आपल्या दुग्धजन्य पदार्थांचे वितरण सक्षम करण्यासाठी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मचा वापर करेल. अमूलच्या कर्नाटकप्रवेशामुळे स्थानिक ब्रँडला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

डिसेंबर मध्ये कर्नाटक दौऱ्यादरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केएमएफ आणि गुजरातच्या आनंद मिल्क युनियन लिमिटेड (अमूल) यांच्या विलीनीकरणासाठी सकारात्मकता दर्शवली होती. तेव्हापासून अमूल विरुद्ध नंदिनी असा संघर्ष पेटला आहे.

# काँग्रेसला सोडचिठ्ठी देणाऱ्यांच्या नावात अदानी!

## राहुल गांधींनी पझलमधून साधला निशाणा

।नवी दिल्ली महाईन्यूज ।

**राहुल गांधी यांचे एक ट्वीट सध्या चर्चेत आले आहे. राहुल गांधी यांच्या ट्वीटमध्ये वर्ड पझल आहे. काँग्रेसला सोडचिठ्ठी देणाऱ्यांची नावे या पझलमध्ये आहेत. त्या सर्वांच्या नावातून अदानी नाव तयार होते, असे ट्विटमध्ये दाखवण्यात आले आहे.**

गुलाम नबी आझाद, ज्योतिरादित्य शिंदे, किरण कुमार रेड्डी, हिमंता बिस्वा सरमा आणि अनिल अँटनी या सर्वांनी काँग्रेसची साथ सोडली आहे. यातील गुलाम नबी आझाद यांनी स्वतःचा पक्ष उघडला तर इतर सर्व भाजपमध्ये गेले आहेत. त्या सर्वांची नावे एकत्र केली तर अदानी यांचे नाव तयार होते असे या ट्वीटमधून राहुल गांधी यांनी दाखवले आहे. याची ट्वीटची सध्या चर्चा सुरु आहे.

राहुल गांधी यांनी ट्वीट करुन अदानी आणि काँग्रेसला सोडणाऱ्यांवर निशाणा साधला असला तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी अदानी समुहाच्या संयुक्त संसदीय समिती चौकशीस नकार दिला आहे. शरद पवार यांच्या वक्तव्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. शरद पवार म्हणाले की, आम्ही हिंडेनबर्ग कंपनीचे नाव कधी ऐकलेलं नव्हतं. त्या कंपनीच्या अहवालात अदानींना लक्ष्य करण्यात आलं असल्याचं दिसतं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या समितीनंतर आता संयुक्त संसदीय समितीच्या नियुक्तीची आवश्यकता राहिली नाही, असेही त्यांनी यावेळी नमूद केलं. ते मुलाखतीत बोलत होते. एका परदेशी कंपनीच्या अहवालाने देशात खळबळ उडाली.






### काँग्रेसला सोडणाऱ्यांवर राहुल गांधींचा निशाणा

**राहुल गांधी यांनी ट्वीट करुन अदानी आणि काँग्रेसला सोडणाऱ्यांवर निशाणा साधला असला तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी अदानी समुहाच्या संयुक्त संसदीय समिती चौकशीस नकार दिला आहे. शरद पवार यांच्या वक्तव्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. शरद पवार म्हणाले की, आम्ही हिंडेनबर्ग कंपनीचे नाव कधी ऐकलेलं नव्हतं. त्या कंपनीच्या अहवालात अदानींना लक्ष्य करण्यात आलं असल्याचं दिसतं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या समितीनंतर आता संयुक्त संसदीय समितीच्या नियुक्तीची आवश्यकता राहिली नाही, असेही त्यांनी यावेळी नमूद केलं.**

# "वैयक्तिक स्वार्थासाठी हुकूमशाही सत्तेचे गुणगान"

## अदानी प्रकरणाबाबत शरद भूमिकेवर काँग्रेस संतप्त

। वॉशिंग्टन । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (NCP) अध्यक्ष शरद पवार यांनी अदानी प्रकरणाबाबत केलेल्या वक्तव्यानंतर राजकारण तापले आहे. आता काँग्रेस नेत्या अलका लांबा यांनी शरद पवारांवर हल्लाबोल केला आहे. शरद पवार यांच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीत देखील बिघाडी होणार असल्याची राजकीय वर्तुळात रंगली आहे.**

अलका लांबा म्हणाल्या, "आज फक्त घाबरलेले, लोभी लोक त्यांच्या वैयक्तिक स्वार्थासाठी हुकूमशाही सत्तेचे गुणगान गात आहेत. एकटे



राहुल गांधी देशातील जनतेची लढाई लढत आहेत. चोरांपासून भांडवलदार आणि चोरांना संरक्षण देणाऱ्या चौकीदाराविरुद्ध राहुल गांधी लढत आहेत'

अदानी समूहावरील आरोपांच्या जेपीसी चौकशीच्या विरोधात नाही, परंतु या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाची समिती अधिक योग्य आणि प्रभावी ठरेल, असे शरद पवार म्हणाले होते. एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीत शरद पवार यांनी अदानी समूहाचा बचाव केला आणि हिंडेनबर्ग संशोधन अहवालाच्या आधारे तयार केल्या जात असलेल्या टिकेवर देखील भाष्य केले.

### शरद पवार यांनी अदानी समूहाचा बचाव

**अदानी समूहावरील आरोपांच्या जेपीसी चौकशीच्या विरोधात नाही, परंतु या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाची समिती अधिक योग्य आणि प्रभावी ठरेल, असे शरद पवार म्हणाले होते. एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीत शरद पवार यांनी अदानी समूहाचा बचाव केला आणि हिंडेनबर्ग संशोधन अहवालाच्या आधारे तयार केल्या जात असलेल्या टिकेवर देखील भाष्य केले.**

संसदेत संख्याबळ पाहता जेपीसीमध्ये २१ सदस्य असतील तर सत्ताधारी पक्षाचे १५ आणि विरोधी पक्षांचे सहा सदस्य असतील, त्यामुळे समितीवर शंका निर्माण होईल, असे पवार म्हणाले होते. मी जेपीसीच्या विरोधात नाही. जेपीसी अनेक वेळा स्थापन झाल्या आहेत आणि मी काही जेपीसीचा अध्यक्ष आहे. बहुमताच्या आधारावर (संसदेत) JPC ची स्थापना केली जाईल. JPC ऐवजी सर्वोच्च न्यायालयाची समिती अधिक योग्य आणि प्रभावी ठरेल असे माझे मत आहे.

# मोदी सरकार 'या' राज्यांमध्ये 7 मेगा टेक्सटाईल प्लांट उभारणार

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।



मेक इन इंडिया उपक्रमाचा एक भाग म्हणून केंद्र सरकारने देशात सात मेगा टेक्सटाईल पार्क उभारण्याची योजना जाहीर केली आहे. पीएम मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रिजन्स अँड अपेरल (PM MITRA) योजनेंतर्गत घोषित करण्यात आलेले हे सात प्लांट तामिळनाडू, तेलंगणा, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये उभारले जातील.

PM मित्र योजना ऑक्टोबर 2021 मध्ये एकूण 4,445 कोटी खर्चासह सुरू करण्यात आली होती आणि 2023-24 च्या अर्थसंकल्पात प्रकल्पासाठी प्रारंभिक वाटप 200 कोटी रुपये करण्याची घोषणा केली आहे. 17 मार्च रोजी ट्विटरवरून, पीएम मोदींनी स्पष्ट केले होते की "पीएम मित्र मेगा टेक्सटाईल पार्क वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी अत्याधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देतील, करोडोची गुंतवणूक होईल आणि लाखो नोकऱ्या निर्माण होतील. हे 'मेक इन इंडिया' आणि 'मेक फॉर द वर्ल्ड'चे उत्तम उदाहरण असेल. केंद्रीय मंत्री पियुष गोयल म्हणाले की, सरकारने सुमारे 20 लाख नोकऱ्या निर्माण करण्याच्या उद्दिष्टासह जवळपास ₹70,000 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा विचार केला आहे.देशात वस्त्रोद्योग असंघटित झाला आहे. या वाढलेल्या अपव्यय आणि लॉजिस्टिक खर्चामुळे देशाच्या वस्त्रोद्योग क्षेत्राच्या स्पर्धात्मकतेवर परिणाम झाला आहे. सात ठिकाणांची निवड करण्याच्या पात्रतेबद्दल बोलताना वस्त्रोद्योग सचिव रचना शाह म्हणाल्या की, त्यांच्या मंत्रालयाने 13 राज्यांतील 18 प्रस्तावांचा विचार करून पारदर्शक पद्धतीने जागा निवडल्या आहेत.

# 'एकटे प्रवास केल्याने आत्मविश्वास वाढतो', सोलो ट्रिपवर श्रुती हसनचे मत




अभिनेत्री श्रुती हसनची गणना दक्षिणेतील दमदार अभिनेत्रींमध्ये केली जाते. श्रुती साऊथसोबतच बॉलिवूड चित्रपटांमध्येही दिसली आहे. अभिनेत्रीने तिच्या नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत सोलो ट्रिपबद्दल सांगितले आहे. ती म्हणाली की जेव्हा तुम्ही एकट्याने प्रवास करता तेव्हा तुम्ही नवीन लोकांना भेटता, नवीन गोष्टी एक्सप्लोर करता. एकट्याने प्रवास केल्याने आत्मविश्वास वाढतो. तुम्ही तुमच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडता.

श्रुती पुढे म्हणाली की मला नेहमीच एकट्याने प्रवास करणे आणि एकटे काम करणे आवडते. मग ते जेवण करणे असो किंवा थिएटरमध्ये चित्रपट पाहणे असो, शहर शोधणे असो, स्वत: गोष्टी करणे आणि नवीन लोकांना भेटणे, स्वत: गोष्टी करण्यास सक्षम असणे हे अत्यंत सक्षम आणि समृद्ध करणारे आहे. तुम्ही ग्रुपसोबत प्रवास करता तेव्हा तुम्हाला स्थानिक लोकांशी संवाद साधता येत नाही.

अभिनेत्रीचा असा विश्वास आहे की महिला एकट्या प्रवाशांसाठी सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची आहे आणि स्थळ निवडण्यापूर्वी तिने तिचा गृहपाठ करावा. ती स्पष्ट करते की मला माहित असलेल्या ठिकाणी मी एकटी प्रवास करते.

मी अशा ठिकाणांना प्राधान्य देते जिथे मी याआधी अनेकदा गेले आहे आणि जिथे मी फक्त काही लोकांना ओळखते. जर तुम्ही एकट्या महिला प्रवासी असाल, तर तुम्ही ऑनलाइन प्लॅटफॉर्मला भेट द्यावी जिथे इतर महिला प्रवासी त्यांचे अनुभव शेअर करतात. हे तुम्हाला सहलीसाठी चांगली तयारी करण्यास मदत करते कारण तुम्ही कोणत्या प्रकारच्या वातावरणात प्रवेश करणार आहात हे तुम्हाला माहीत आहे.

# बुलेटवर रंगला रोमान्स!



बॉलीवूड अभिनेता शाहिद कपूर हा त्याच्या फर्जी या वेबसिरिजमुळे चांगलाच चर्चेत होता. त्याने या वेबसिरिजच्या माध्यमातुन ओटीटीवर धमाकेदार एंट्री केली. त्याची ही वेबसिरिज तुफान चालत आहे. या सिरिजने अनेक रेकॉर्ड तयार केले.

शाहिद हा नेहमीच त्याच्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करतो. त्याची चॉकलेट बॉय इमेज त्याच्या चाहत्यांना खुपच आवडते. मात्र आता शाहिद केवळ चॉकलेट बॉयच्या इमेजसाठीच नाही तर वेगवेगळ्या भुमिकासाठी चाहत्यांना आवडू लागला आहे.

शाहिद आणि राशी खन्नाची जोडी प्रेक्षकांना खुपच आवडली. या जोडीची हा पहिल वेळ होती. आता शाहिद पुन्हा एकदा नव्या जोडीसोबत प्रेक्षकांच्या मनावर राज्य करण्यासाठी सज्ज झाल्याचं दिसत आहे.सुपरस्टार शाहिद कपूर आणि अभिनेत्री क्रिती सेनॉन यांची जोडी लवकरच एका लव्ह स्टोरीत चित्रपटात दिसणार आहे. ही पहिलीच वेळ असेल जेव्हा शाहिद आणि क्रिती एका चित्रपटात एकत्र स्क्रीन शेअर करताना दिसणार आहेत. शाहिद कपूर आणि क्रिती सेनॉनच्या या अनटोल्ड रोमँटिक चित्रपटाचे फर्स्ट लूक पोस्टर समोर आला आहे.

या चित्रपटाचे नाव अद्याप निश्चित झालेले नाही.रिलीज झालेल्या पोस्टरबद्दल सांगायचे तर, शाहिद आणि क्रिती बीचवर

# नागराज मंजुळे यांना मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार चोरीला..

फॅन्ड्री, सैराट, नाळ, झुंड आदी दर्जेदार चित्रपटांच्या माध्यमातून समाजातील वंचितांचे प्रश्न समोर आणणारे त्यावर सडेतोडपणे भाष्य करणारे एक संवेदनशील दिग्दर्शक म्हणजे नागराज पोपटराव मंजुळे.

नागराज सोशल मीडियावर बरेच सक्रिय असतात. त्यांच्या पोस्टकडे सर्वांचे लक्ष लागलेले असते. कालच त्यांचा 'घर बंदूक बिरयानी' हा चित्रपट रिलीज झाला. या चित्रपटाला राज्यभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे.



पण याच चित्रपटाच्या निमित्ताने नागराजने एका मुलाखतीत बोलताना मोठा गौप्यस्फोट केला आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल नागराज यांना मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार चोरीला गेला आहे. याबाबत त्यांनी एका मुलाखतीत सविस्तर सांगितले.

नागराज मंजुळे यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये सर्वोच्च अशा राष्ट्रीय पुरस्काराचाही समावेश आहे. पण तुम्हाला ऐकून आश्चर्य वाटेल की, नागराज यांना 'पिस्तुल्या' या लघुपटासाठी मिळालेला पहिला राष्ट्रीय पुरस्कार चोरीला गेला आहे.

हा प्रकार नेमका काय आहे याविषयी नागराज एका मुलाखतीत बोलले आहेत. नागराज म्हणाले, ' फॅन्ड्री सिनेमाच्या शूटिंगमध्ये आम्ही व्यग्र होतो. सिनेमाच्या शूटिंगचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे आई आणि भाऊसुद्धा सेटवर आले होते. घरात कोणीही नव्हतं. हीच संधी साधत चोराने घरात डल्ला मारला आणि नेमका माझा राष्ट्रीय पुरस्कारही त्याने चोरला.'पुढे ते म्हणाले, 'मी त्या चोराचा शोध घेण्याचा प्रयत्न केला नाही. कारण मी त्याला शोधत बसलो असतो, तर माझं पुढचं काम मला लक्ष देऊन करता आलं नसतं. त्याचा परिणाम माझ्या आगामी चित्रपटांवर झाला असता. आणि तसंही मला मिळालेली ट्रॉफी चोरीला गेली आहे, पण तो पुरस्कार तर माझ्याच नावावर नोंद आहे. त्यामुळे मला गोष्टींचा फारसा फरक पडत नाही.'

# 'माय पुष्पराज...' 'श्रीवल्ली'ची अल्लू अर्जुनसाठी लई भारी पोस्ट



साऊथचा सुपरस्टार अल्लू अर्जुन आज त्याचा ४१ वा वाढदिवस साजरा करत आहे. अभिनेत्याच्या वाढदिवसानिमित्त चाहते आणि सर्व सेलिब्रिटी सोशल मीडियावर शुभेच्छा देत आहेत. दुसरीकडे, रश्मिकानेही तिचा 'पुष्पा' को-अॅक्टर अल्लू अर्जुनला सोशल मीडियाच्या माध्यमातून खास वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

'पुष्पा'ची श्रीवल्ली म्हणजेच रश्मिकाने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीजवर अर्जुनसोबतचा एक सुंदर फोटो शेअर केला आहे. फोटोमध्ये दोन्ही स्टार्स कॅमेऱ्यासमोर पोज देताना दिसत आहेत. हा फोटो शेअर करण्यासोबतच रश्मिकाने अभिनेत्यासाठी एक गोंडस कॅप्शनही लिहिले आहे.

रश्मिकाने लिहिले, "माझ्या पुष्पराज, अल्लू अर्जुनला वाढदिवसाच्या शुभेच्छा. संपूर्ण जग तुला पुन्हा पुष्पाच्या रूपात पाहण्याची वाट पाहत आहे आणि मला आशा आहे की ते तुझ्यावर खूप प्रेम करतील. तुम्हला खूप सारं प्रेम सर."

त्याचवेळी अल्लू अर्जुननेही रश्मिकाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छांना उत्तर देताना हा फोटो त्याच्या सोशल मीडिया हँडलवर री-शेअर केला आहे. अभिनेत्याने कॅप्शनमध्ये लिहिले की, "धन्यवाद श्रीवल्ली."

या सर्वादरम्यान, शुक्रवारी, लोकप्रिय तेलुगू अभिनेत्याने त्याच्या वाढदिवसापूर्वी चाहत्यांना भेटवस्तू देताना त्याच्या ब्लॉकबस्टर चित्रपटाच्या सिक्वेल 'पुष्पा 2: द रुल' चे पोस्टर त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केले होते. पोस्टरमध्ये अल्लू अर्जुन पूर्णपणे नवीन अवतारात दिसत आहे. या पोस्टरमुळे चाहत्यांची उत्सुकता आणखीनच वाढली आहे.

# मुंबई विरोधात झळकला अजिंक्य रहाणे




। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**चेन्नई टीमचा फलंदाज असलेला मुंबईकर अजिंक्य रहाणेने वानखेडेच्या मैदानावर झंझावती खेळी करत अवघ्या १९ चेंडूंमध्ये झंझावाती अर्धशतक करत मुंबईच्या गोलंदाजांची पिसं काढली. चेन्नईकडून रहाणेने पदार्पण केलं आणि पहिल्याच सामन्यात त्याचा फॉर्म दिसून आला.**

मुंबईने दिलेल्या १५८ धावांच्या माफक आव्हानांचा पाठलाग करताना चेन्नईची सुरूवात ढेपाळली होती. डेवॉन कॉनवे गोल्डन डक झाला.

त्यामुळे पहिल्याच षटकात अजिंक्य रहाणे मैदानावर आला. त्यानंतर त्याने मॅचचं चित्र बदललं. वानखेडे मैदानावर चौफेर टोलेबाजी करत अजिंक्यने १९ चेंडूंमध्ये झंझावाती अर्धशतक झळकावलं. १९ चेंडूंमध्ये ५० धावा करताना अजिंक्यने तीन षटकार आणि सात चौकारांची आतषबाजी केली.

अजिंक्य रहाणेने २७ चेंडूंमध्ये ६१ धावा केल्या. ऋतुराजसोबत अजिंक्यने ८२ धावांची पार्टनरशिप केली. यामध्ये एकट्या अजिंक्यच्या ६१ धावा होत्या. त्याचा फॉर्म परत आल्याचं पाहायला मिळालं.अजिंक्य रहाणेने यंदाच्या आयपीएलमधील सर्वात वेगवान अर्धशतक झळकावलं.

## आयपीएलमधील सर्वात वेगवान अर्धशतक

» वानखेडे मैदानावर चौफेर टोलेबाजी करत अजिंक्यने १९ चेंडूंमध्ये झंझावाती अर्धशतक झळकावलं. १९ चेंडूंमध्ये ५० धावा करताना अजिंक्यने तीन षटकार आणि सात चौकारांची आतषबाजी केली. अजिंक्य रहाणेने २७ चेंडूंमध्ये ६१ धावा केल्या. ऋतुराजसोबत अजिंक्यने ८२ धावांची पार्टनरशिप केली. यामध्ये एकट्या अजिंक्यच्या ६१ धावा होत्या. त्याचा फॉर्म परत आल्याचं पाहायला मिळालं.अजिंक्य रहाणेने यंदाच्या आयपीएलमधील सर्वात वेगवान अर्धशतक झळकावलं.

याआधी हा विक्रम शार्दुल ठाकूरच्या नावावर होता.शार्दुल ठाकूरने आरसीबीविरोधात २० चेंडूत अर्धशतक झळकावले होते. रहाणेने हा विक्रम मोडीत काढत अवघ्या १९ चेंडूत अर्धशतक झळकावले. अजिंक्य रहाणेचे सोशल मीडियावर कौतुक होत आहे. नेटकरी त्याच्या दमदार खेळीचे कौतुक करत आहेत.

# रजवाड्यांपुढे दिल्लीने टेकले गुडघे!

## » राजस्थानने कॅपिटल्सचा तब्बल 57 धावांनी उडवला धुव्वा

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३चा ११वा सामना राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात रोमांचक सामना झाला. दोन्ही संघ आपला शेवटचा सामना गमावल्यानंतर मैदानात उतरले होते. अशा स्थितीत राजस्थान संघाने हा सामना ५७ धावांनी जिंकून गुणतालिकेत अव्वल स्थान गाठायचे प्रयत्न केला. त्याचवेळी दिल्लीचा संघ स्पर्धेतील पहिला विजय मिळवण्याच्या इराद्याने उतरला होता पण ट्रेंटने कॅपिटल्सचे बोल्ट टाइट करत मोठे झटके दिले. दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तो सपशेल अपयशी ठरला. दिल्ली केवळ १४२ धावाच करू शकली.**

राजस्थान रॉयल्सने ठेवलेल्या २०० धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात खराब झाली. दिल्लीचे खाते उघडण्यापूर्वीच दोन विकेट्स पडल्या होत्या. पृथ्वी शॉनंतर मनीष पांडेही तंबूत परतला. ट्रेंट बोल्टने त्याला विकेट्ससमोर पायचीत केले. मनीष पांडे पहिल्याच चेंडूवर भोपळाही न फोडता बाद झाला. ट्रेंट बोल्टला हॅटट्रिक करण्याची संधी होती मात्र तो करू शकला नाही. दिल्ली कॅपिटल्सची तिसरी विकेट ३६ धावांवर पडली. रिले रुसो १२ चेंडूत १४ धावा करून बाद झाला. त्याने आपल्या खेळीत दोन चौकार मारले. रविचंद्रन अश्विनने त्याला यशस्वी जैस्वालकरवी झेलबाद केले.कर्णधार वॉर्नरने ललित यादवला हाताशी घेत डाव सावरत अर्धशतकी भागीदारी केली. मात्र ललित ३६ धावा करून बाद झाला. अष्टपैलू अक्षर पटेलही फारशी काही कामगिरी करू शकला नाही. रोवमन पॉवेल अवघे दोन धावा करून बाद झाला. अखेर डेव्हिड वॉर्नरची अर्धशतकीय झुंजार खेळी



अपयशी ठरली. राजस्थानकडून ट्रेंट बोल्ट आणि युजवेंद्र चहलने प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. तर त्या पाठोपाठ रविचंद्रन अश्विनने २ आणि संदीप शर्माने एक विकेट घेत त्यांना साथ दिली.

तत्पूर्वी, राजस्थानने आज पुन्हा एकदा त्यांच्या फलंदाजीतील ताकद दाखवून दिली. यशस्वी जैस्वाल व जॉस बटलर यांनी पहिल्या विकेटसाठी वादळी सुरुवात केली आणि ८.३ षटकांत ९८ धावा चढवल्या. यशस्वी ३१ चेंडूंत ११ चौकार व १ षटकारासह ६० धावांवर माघारी परतला. संजू सॅमसन (०) व रियान पराग (७) अपयशी ठरल्याने राजस्थानच्या धावांचा वेग मंदावला होता. बटलर व शिमरॉन हेटमायर या जोडीने तो वेग पुन्हा मिळवून दिला.

# १० एप्रिलपासून पंजाब किंग्ज करणार धमाका?

। बुलढाणा। महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।



इंडियन प्रीमियर लीगमध्ये शिखर धवनच्या नेतृत्वात खेळणाऱ्या पंजाब किंग्जने सुरुवातीचे दोन्ही सामने जिंकले आहेत. अशा परिस्थितीतही पंजाबमध्ये एका धाकड फलंदाजाची कमी असल्याचं बोललं जात आहे. त्यामुळे येत्या १० एप्रिलपासून धडाकेबाज इंग्लिश फलंदाज लियाम लिविंगस्टोन मैदानात उतरणार आहे. आनंदाची बाब म्हणजे इंग्लंड एंड वेल्स क्रिकेट बोर्डाकडून लियामला फिटनेस सर्टिफिकेट मिळणार आहे. लियाम चार महिन्यांपूर्वी पाकिस्तानमध्ये कसोटी क्रिकेट पदार्पणावेळी दुखापतग्रस्त झाला होता. त्याच्या गुडघ्याला दुखापत झाली होती. त्यामुळे लियाम प्रतिस्पर्धी क्रिकेट खेळला नाही.

आयपीएलच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लिविंगस्टोन १० एप्रिलला भारतात येणार आहे.पंजाब किंग्जचा पुढील सामना ९ एप्रिलला सनरायझर्स हैद्राबाद विरुद्ध होणार आहे. या सामन्यात लियाम खेळणार नाही. पण १३ एप्रिलला होणाऱ्या चौथ्या सामन्यात लियाम मैदानात उतरण्याची शक्यता आहे. लियामने म्हटलंय की, तो लवकरच पूर्ण फिट होऊ शकतो. मी आता त्या ध्येयापर्यंत पोहचत आहे. मागील दोन महिन्यांचा कालावधी खूप कठीण होता. पण आता मी लहान मुलांप्रमाणे क्रिकेट खेळण्यासाठी खूप उत्सुक आहे

.दोन दिवसांच्या आत मला तिकडे जाण्याची परवानगी मिळेल, अशी आशा आहे. मी खेळण्यासाठी आग्रही आहे. पुढील ४८ तासांत मला याबाबत वरवानगी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. मागील सीजनमध्ये पंजाबने लियामला वर्षभराच्या मानधनाच्या रुपात ११ कोटी रुपये दिले होते. यंदाच्या हंगामातही लियामला याच रक्कमेत रिटेन करण्यात आलं आहे.